# मिरा भाईंदर महानगरपालिका
## आयुक्त कार्यालय
स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि. ठाणे ४०१ १०१ "माझे शहर, माझा अभिमान"

25 वर्षे विकासाची

जा.क्र.मनपा/आयुक्त/२१/२०२६-२७ दिनांक :- १८/०५/२०२६

## आदेश

**विषय :- मा. महासभेमध्ये मा. महापौर यांनी दिलेल्या निर्देशानुसार कार्यवाही प्रस्तावित करणेबाबत.**

सर्व विभाग प्रमुख / खाते प्रमुख यांस आदेशित करण्यात येत आहे की, मा. महापौर यांचे मान्यतेने प्रत्येक महिन्यामध्ये मा. महासभेचे आयोजन करण्यात येत असते. सदर सभेमध्ये विविध विषयांवर चर्चा करण्यात येत असून, काही प्रकरणांमध्ये मा. महापौर यांचेमार्फत विभाग प्रमुख / खाते प्रमुख यांस कार्यवाहीबाबत निर्देश देत असतात. सदर निर्देशाची संबंधित विभागाचे अधिकारी यांनी नोंद घेऊन नियमानुसार आवश्यक कार्यवाही प्रस्तावित करणे अपेक्षीत आहे. तथापी, मा. महापौर यांनी दिलेल्या निर्देशाची विभागप्रमुख / खातेप्रमुख यांचेकडून नोंद घेतली जात नसल्याने व कार्यवाही प्रस्तावित केली जात नसल्याने, दि. १६/०५/२०२६ रोजीच्या विभागप्रमुख / खातेप्रमुख यांचे बैठकीमध्ये मा. महापौर यांनी नाराजी व्यक्त केलेली आहे.

सबब, या आदेशान्वये आपणांस सुचित करण्यात येते की, मा. महासभेमध्ये मा. महापौर यांनी दिलेले निर्देश ज्या विभागाशी निगडीत आहेत, त्या विभागाचे विभाग प्रमुख / खाते प्रमुख यांनी त्याची नोंद घ्यावी व दिलेल्या निर्देशानुसार नियमानुसार आवश्यक कार्यवाही ७ दिवसात प्रस्तावित करुन, कार्यवाहीबाबतचा अनुपालन अहवाल मा. महापौर यांचेकडे सादर करण्यात यावा.

सदर आदेशाची काटेकोर अंमलबजावणी करावी. अन्यथा संबंधित विभाग प्रमुख / खाते प्रमुख कार्यवाहीस पात्र ठरतील, याची नोंद घ्यावी.

**(राधाबिनोद अ. शर्मा,** भा.प्र.से.)
**आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रत :-**
**विभागप्रमुख / खातेप्रमुख (सर्व)**

**प्रत :- माहितीस्तव**
**मा. महापौर, मिरा भाईंदर महानगरपालिका**